।।श्री समर्थ प्रसन्न।।
।।संहतिः कार्यसाधिका।।

स्थापना
१९३१

# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, गिरगांव, मुंबई.

(रजिस्टर्ड नं. PT-A2657 Mumbai)

कार्यालय - गणेश कृपा, रु. नं. १०२, पहिला मजला, २३, डॉ.देशमुख लेन, वि.प.रोड,
गिरगांव, मुंबई - ४०० ००४, दुरध्वनी : २३८२७८८९, वेबसाईट : www.drbsgirgaon.in
ई-मेल : drbsgirgaon@gmail.com

सभासद बंधू-भगिनिंनो,

स.न.वि.वि.

आपल्याशी पत्र व्यवहार करताना अतिशय आनंद होत आहे. आपल्या संस्थेचा **शतक महोत्सवी वर्षाकडे वाटचाल करणारा ९५वा वर्धापन दिन रविवार दिनांक २१ जून २०२६** रोजी सकाळी ९.३० वाजल्यापासून संघाच्या **''ऋग्वेद सभागृहा''** मध्ये साजरा करण्याचे निश्चित केले आहे. तसेच त्याच दिवशी सायंकाळी ४.०० वाजता संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा त्याच ठिकाणी होणार आहे. आपण आता १००व्या वर्धापन दिनाच्या जवळ जात आहोत आणि म्हणूनच आपल्या सर्व सभासदांच्या सहकार्याची गरज संघास आहे. त्यामुळे आपण आताच्या होणाऱ्या ९५ व्या वर्धापन दिनापासून होणाऱ्या सर्व कार्यक्रमाला हजर राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी ज्यामुळे आम्हां कार्यकर्त्यांचा उत्साह वाढेल यात शंकाच नाही. वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस वर्धापन दिनाच्या पत्रासोबत पाठवित आहोत. तसेच वर्धापन दिनाची आमंत्रण पत्रिका योग्य वेळी पाठविली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

वर्धापन दिनानिमित्त सकाळपासून विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या दिवशी सभासदांना **सकाळी ९.३० ते १०.०० या वेळेत अल्पोपहार देण्यात येईल. तसेच दुपारी १.०० वाजता भोजनाची सोय केलेली आहे. यासाठी शुल्क रुपये २५०/- (प्रत्येकी) निश्चित करण्यात आले आहे.**

या वर्धापन दिनी पहिली ते बारावी तसेच सभासदांच्या ज्या पाल्यांनी चालू वर्षात इंजिनियरिंग, आर्किटेक्चर, वैद्यकीय क्षेत्र, कॉमर्स, आर्ट्स व सायन्स यामध्ये पदवी अथवा पदविका प्राप्त केली असेल अशा पाल्यांचा संघातर्फे गौरव करण्यात येणार आहे. त्यासाठी अर्ज व गुणपत्रिकेची झेरोक्स टपालाद्वारे अथवा संघाच्या कार्यालयात पाठवावेत.

आपल्या कार्यक्रमात पाहुणे म्हणून अनेक विद्वान व्यक्ती येतात व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात यासाठी सभासदांना विनंती की त्यांनी आपल्या पाल्यांना कार्यक्रमास येण्याचा जरुर आग्रह धरावा.

सभासदांना नम्र विनंती आहे की वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाची व भोजनाची कुपन्स उल्लेख केलेल्या अंतिम तारखेपूर्वी संघाच्या कार्यालयातून पैसे भरुन घेऊन जावीत. कार्यक्रमाच्या दिवशी कोणासही कुपन्स देण्यात येणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी. कृपया कुठलाही गैरसमज नसावा. आपल्या सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा आहे.

ज्या सभासदांना प्रत्यक्ष येऊन पैसे भरुन कुपन्स घेता येत नसतील अशांनी आपल्या कुपन्सचे पैसे आपल्या संघाच्या बँकेच्या खात्यात भरावेत. आपण बँक ऑफ बरोडाच्या कुठल्याही शाखेत सदर पैसे भरु शकता. त्यासाठी बँकेचा तपशील खालीलप्रमाणे :-

| | | |
|---|---|---|
| ACCOUNT NAME | : | D.R.B.SANGH GIRGAON |
| BRANCH ADDRESS | : | BANK OF BARODA,<br>V.P.ROAD BRANCH (SIKKANAGAR)<br>GIRGAON, MUMBAI - 400 004. |
| SAVING A/C NO. | : | 13100100002884 |
| IFSC CODE | : | BARBOVPROAD |

स्थापना
१९३१

।।श्री समर्थ प्रसन्न।।
।।संहतिः कार्यसाधिका।।

# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, गिरगांव, मुंबई.

(रजिस्टर्ड नं. PT-A2657 Mumbai )

कार्यालय - गणेश कृपा, रु. नं. १०२, पहिला मजला, २३, डॉ.देशमुख लेन, वि.प.रोड,
गिरगांव, मुंबई - ४०० ००४, दुरध्वनी : २३८२७८८९, वेबसाईट : www.drbsgirgaon.in
ई-मेल : drbsgirgaon@gmail.com



आपण आपले पैसे भरल्यास कृपया **९८३३०३२१५४ / ९९६९०२६३४० / ९९६७७६५९३०** या तीन संपर्क क्रमांकामधील कुठल्याही एका क्रमांकावर एस.एम.एस.पाठवावा व त्यामध्ये आपले नांव व किती व्यक्तींचे पैसे भरले एवढेच कळवावे. आपण पैसे भरल्याची काउंटर स्लीप कार्यक्रमांच्या दिवशी आमच्या कार्यकर्त्याला दाखविल्यावर आपल्याला कुपन्स देण्यात येतील.

**भोजन शुल्क रु. २५०/- एका सभासदासाठी**

**विद्यार्थ्याचे अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख : १५.६.२०२६**

**भोजन शुल्क भरण्याची अंतिम तारीख : १५.६.२०२६**

**अल्पोपहाराची वेळ : सकाळी ९.३० ते १०.०० वाजेपर्यंत**

**कार्यालयाचा पत्ता** :- गणेश कृपा, रु.नं.१०२, पहिला मजला, २३, डॉ.देशमुख लेन, वि.प.रोड, गिरगांव, मुंबई - ४०० ००४.

कार्यालयाची वेळ : दररोज सकाळी १०.३० ते १२.३० व संध्याकाळी ५.३० ते ७.३०

सोमवार १, ८ व १५ जून या दिवशी कार्यालय चालू राहिल)

या आपल्या संघाच्या वर्धापन दिनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी ही नम्र विनंती.

आपली नम्र
सौ. मनिषा काळविंट
कार्यवाह

दिनांक ८ मे २०२६

टीप :- संघाचा कार्यालयीन खर्च दिवसें दिवस वाढत चालल्याने सभासदांना विनंती की त्यांनी त्यांच्या किंवा घरातील सदस्यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच दिवंगतांच्या स्मृति प्रीत्यर्थ ऐच्छिक देणगी देवून संघास उपकृत करावे.